## प्रकरण पाचवे

## बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या कवितेत आढळणारी विविधरूपे

# - प्रकरण पाचवे -

## बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्गकवितेत आढळणारी विविधरूपे

दोन निसर्गकवींनी एकाच निसर्गदृश्याचे केलेले निसर्गचित्रण समान असू शकत नाही. इंद्रधनुष्य, फुले, फुलपाखरु, पक्षी, निर्झर, उषा, संध्या चांदणीरात्र इत्यादी विषयांवर लिहिलेल्या भिन्न भिन्न कवींच्या कवितांचा अभ्यास केला तर प्रत्येकाच्या चित्रणात काहीना काही वेगळीक आढळतेच. अशी वेगळीक निर्माण होण्याची अनेक कारणे सांगता येतील. भौगोलिक विभिन्नत्व, कवीची साहित्यिक भूमिका, त्याच्यावरील विशिष्ट साहित्य संप्रदायाचा प्रभाव, त्याची दार्शनिक आणि धार्मिक बैठक ही ती कारणे होत. निसर्गचित्रणात वस्तू जरी समान असली तरी कविव्यक्तित्वानुरुप तिचे चित्रण वेगळे बनते, असेच दिसून येते. या कविव्यक्तिमत्वाचे विश्लेषण केले असता वर सांगितलेले घटकच मोठे प्रभावी असलेले आढळून येतात. कविकृत निसर्गचित्रणात आढळणारी रुपेही कविव्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेली असतात.

काव्यामध्ये निसर्ग विविध रूपांनी येतो. निसर्गचित्रणामध्ये प्रामुख्याने १] आलम्बनरूप निसर्ग-चित्रण, २] उद्दीपनरूप निसर्गचित्रण, ३]मानवीकरणरूप निसर्गचित्रण, ४] पृष्ठभूमिरूप निसर्गचित्रण , ५] तत्त्वज्ञानप्रतिपादनरूप निसर्गचित्रण, ६] उपदेशरूप निसर्गचित्रण आणि ७] अलंकरणरूप निसर्गचित्रण ही रूपे आढळतात. आलम्बनरूप निसर्गचित्रणामध्ये निसर्ग हा आलम्बन बनतो, आणि कवी स्वत: आश्रय असतो. आलम्बनरूप निसर्गामुळे आश्रयरूप कवि-हृदयात अनेक भावलहरी निर्माण होतात आणि एक उत्कृष्ट निसर्गकविता आपणांस मिळते. अशा चित्रणात निसर्ग हाच कवीच्या आनंदाचे कारण असतो. तो निसर्गाच्या सान्निध्यात येतो आणि त्याच्या सहज सौंदर्याने तल्लीन होऊन जातो. निसर्गात अनेक रंग भरुन राहिलेले आहेत. केवढे तरी आकृतिसौंदर्य सामावून बसले आहे. कर्णमधुर असे अनेक ध्वनी आहेत, गंधवैभव

आहे. अशा बहुढंगी बहुरंगी निसर्गामुळे कवी अनुभूतिशील बनतो आणि निसर्गातील गती, वर्ण, नाद, गंध यांची सूक्ष्म चित्रे रेखाटतो. अशा आलम्बनरूप निसर्गचित्रणात प्राय: निसर्गाचे स्वाभाविक, यथातथ्य चित्र व्यक्त होते. उद्दीपनरूप निसर्गचित्रणात निसर्ग साधनरूपाने येतो. यात नायक-नायिकादी विभावांच्या शृंगारक्रीडेचे निसर्गचित्रण उद्दीपन बनते. मानवीकरणरूप निसर्गचित्रणात निसर्गाला सचेतन मानून त्यावर मानवी भावभावनांचे आरोपण केले जाते. यात कवी निसर्गावर मानवी चैतन्याचा, मानवी क्रिया-व्यापारांचा, आणि मानवी आकारांचा आरोप करतो. एखाद्या कथानकाची किंवा अन्य दृश्यांची पार्श्वभूमी म्हणून जे निसर्गचित्रण केले जाते त्याला पृष्ठभूमिरूप निसर्गचित्रण म्हणतात. "कुमार--संभवा" च्या प्रारंभी कालिदासाने केलेले हिमालयाचे वर्णन पृष्ठभूमि--रूपच आहे. अशा निसर्गचित्रणामुळे वर्ण्यविषयसंबध्द एक वातावरण निर्माण करण्याचे कार्य घडते. निसर्गातील राशिराशी सौंदर्याचे अवलोकन करत असतांना या सौंदर्याचा निर्माता कोण, अशी जिज्ञासा कविमनात निर्माण होते. " हे अनंत रमणीय कौन तुम? " असे तो विचारु लागतो. अशी तात्त्विकदृष्टीने निसर्गाकडे पाहण्याची प्रवृत्ती निर्माण होते आणि त्यातून तत्त्वज्ञानप्रतिपादनरूप निसर्गचित्रणाची निर्मिती होते. निसर्ग आपला गुरु आहे. तो आचार-विचाराच्या बाबतीत आपल्याला काही शिकवितो, मार्गदर्शन करतो अशाप्रकारच्या काव्यातील निसर्गचित्रणाला उपदेशरूप निसर्गचित्रण म्हणतात. कवी आपला वर्ण्यविषय सजवितांना, एखाद्या गोष्टीचा उलगडा करताना उपमानरूपाने निसर्गवस्तूंची योजना करतो. अशा योजनेला अलंकरणरूप निसर्गचित्रण असे म्हणतात. या सर्व निसर्गरूपांचा अधिक विचार पहिल्या प्रकरणात केलेलाच आहे.

बालकवींच्या निसर्गकवितेते आढळणारी विविधरूपे

बालकवींच्या कवितेत आलम्बनरूप निसर्गचित्रणाची काही उदाहरणे मिळतात. " औदुंबर", " श्रावणमास", "खेड्यातील रात्र", "पारवा " या कवितेत असे चित्रण आढळून येते. "औदुंबर" ही कविता म्हणजे सर्वांगपरिपूर्ण शब्दचित्राचे एक सुरेख उदाहरण होय -

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासावळा झरा वाहतो बेटाबेटांतुन.
चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे,
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे.
पायवाट पांढरी तयातुनि अडवीतिडवी पडे,
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.
झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर,
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर.

समर्पक शब्दांची योजना करून यथातथ्य चित्र रेखाटण्याचे बालकवींचे कौशल्य याठिकाणी कळसास पोचले आहे. या कवितेचे समीक्षकांनी भिन्न भिन्न अर्थ केलेले आहेत. कोणी या कवितेमध्ये वैराग्याचा अर्थ शोधतो, [१] [ दि. के. बेडेकर ] कुणाला, " पायवाटे" मध्ये तरुणीचा आणि औदुंबरामध्ये पुरुषाचा साक्षात्कार होतो, [२] तर

---

[१] दि. के. बेडेकर, साहित्य निर्मीती आणि समिक्षा

[२] आलोचना, जुलै ७१.

तर कुणी औदुंबरामध्ये रूसलेल्या बालकाची प्रतिमा पाहतो [कमलाकर दीक्षित][१] वास्तवात एका निसर्गरम्य देखाव्याचे बालकवींनी मोजक्या शब्दांत यथातथ्य चित्र येथे रेखाटले आहे. निळ्यासावळ्या झऱ्याची आंदोलने आणि गतिमानता येथे केवळ शब्दांकितच नव्हे तर, नादांकितही झाली आहे. ऐल तटावर पैल तटावर हिरवळ घेऊन निळासावळा झरा येथे बेटाबेटांतून वाहातो आहे. निळासावळा झरा, शेतमळ्यांची हिरवी गरदी, आडवी तिडवी पडलेली पांढरी पायवाट हे सारेच वर्णन वस्तुस्थितीचे पूर्ण निदर्शक आहे. डॉ. रा. शं. वाळिंबे लिहितात, " बालकवींनी या दृश्याचे इतके सुंदर वर्णन केले आहे की, एखादा चित्रकाराने काढलेले लँडस्केपच आपण पाहात आहोत असा भास झाल्याविना राहणार नाही ".[२] डॉ. वा. पु. गिंडेही या कवितेतील निसर्गचित्रणा-बद्दल सांगतात, " हे सारे [ प्रतीकात्मक अर्थ ] बाजूला ठेवून कवितेकडे पाहिले तर काय दिसते? एका निसर्गाचे अतिशय सजीव चित्रण. चित्रकाराला सुध्दा हेवा वाटावा अशा रंगांच्या कुंचल्याने बालकवींनी चित्र रेखाटले आहे". [३] झऱ्याचा हिरवागार काठ, मधूनच अल्लडपणे वाहत जाणारा निळासावळा झरा, जवळच्या टेकडीपलीकडे एक चिमुकले गाव. तेही चार घरांचे. गजबज, गोंधळ नाही. सळसळणारी हिरवीगार शेते, त्यांची गर्दी. त्या हिरव्यागार कुरणामधूनच पुढे जाणारी पायवाट -थेट डोहाकडे जाणारी आणि त्या डोहातील लाटां-कडे पाहात बसलेला - " असला" औदुंबर. हे सारे दृश्य वाचकाच्या नजरेसमोर जसेच्या तसे तरळत राहते.

"औदुंबर" कवितेप्रमाणेच " श्रावणमास " या कवितेतही साध्यरूप निसर्गचित्रण आलेले आहे-

---

[१] कमलाकर दिक्षित, औदुंबर एक आकलन, नवभारत , मे. १९६४.

[२] डॉ. वा. पु. गिंडे , बालकवींची कविता, एक रसास्वाद, नवसाहित्य प्र. बेळगांव, प्र. आ. १९७२ पृ. ५०

[३] डॉ. रा. शं. वाळिंबे , फुलराणी [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टल, पुणे, प्र. आ. ८६

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे.
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे ।
झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा । तो उघडे ,
तरुशिखरांवर, उंच घरांवर, पिवळेपिवळे ऊन पडे.
उठती वरती जलदावरती अनंत संध्याराग पहा
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा.
फडफड करुनी भिजले अपुले पंख पाखरे सावरिती,
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळासह बागडती.
खिल्लारे ही चरती रानी, गोपही गाणी गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरे
सुवर्णचम्पक फुलला, विपिनी रम्य केवडा दरवळला,
पारिजातही बघता भामारोष मनीचा मावळला ।
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हदयात,
वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे श्रावणमहिन्याचे गीत.

या कवितेत बालकवींनी श्रावणमासातील निसर्गाचे एक संश्लिष्ट चित्र रेखाटले आहे. श्रावणमहिन्यातील निसर्गाच्या दर्शनाने झालेला आनंद बालकवींनी या कवितेत व्यक्त केला आहे. निसर्गाचे नादलयमय असे एक जिवंत चित्र या कवितेत आढळते. चोहिकडे दाटलेली हिरवळ, दुहेरी इंद्रधनुचे वक्र सप्तरंग, अनंत संध्याराग, पिवळे ऊन, आकाशातून जाणाऱ्या शुभ्ररंगी बलाकमाला, सुवर्ण-चम्पक अशा अनेक रंगांच्या छटा या कवितेत आल्या आहेत. ऊनपावसाचा चालणारा लपंडाव, आकाशातून उडत चालेली बलाकमाला, फडफड करीत पंख सावरणारी

पाखरे, निजबाळासह बागडणा-या सुंदर हरिणी, चरणारी खिल्लारे, मंजुळ पावा वाजविणारे गोप, दरवळणारा केवडा, फुलेपत्री खुडणा-या सुंदर बाला, - सारा निसर्ग येथे गतिमान झाला आहे. निसर्गाचे एक सुरेख चित्र बालकवींनी येथे टिपले आहे.

" पारवा " या कवितेतही बालकवींनी निसर्गाचे यथातथ्य चित्र रेखाटले आहे. " खेड्यातील रात्र " या कवितेतही निसर्गाचे असे वास्तव चित्रण आहे. बालकवींनी निसर्गाच्या रेखाटलेल्या अशा यथा--तथ्य चित्रणात साध्यरूप निसर्गचित्रण आढळते.

बालकवींमध्ये मानवीकरणाची एक प्रबल प्रवृत्ती होती. बालसुलभवृत्तीमुळे त्यांना निसर्गात सारीकडे बालरूपेच भरलेली आढळत. बालकवीकृत निसर्गाच्या मानवी करणाचा आपण तिस-या प्रकरणात विचार केलेलाच आहे. बालकवी निसर्गाचे मानवीकरण कसे करीत हे स्पष्ट होण्याच्या दृष्टीने आणखी काँही उदाहरणे देता येतील. " " फुलराणी कविता ही आरपार मानवीकरणाने भरलेली आहे. या कवितेत प्रभातवात स्वर्भूमीचा हात जुळवीत नाचत असतो, ग्रहमाला आपल्या खेळाने दमतात आणि हळूहळू लपावयाला लागतात, अशा विरहकाली फुलराणी मात्र अधापि स्वप्नातच दंग असते -

> स्वर्भूमीचा जुळवित हात - नाचनाचतो प्रभातवात,
> खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला - हळुहळु लागति लपावयाला
> विरू लागले संशयजाल, संपत ये विरहाचा काल.
> शुभ्रधुक्याचे वस्त्र लेवुनी - हर्षनिर्भरा नटली अवनी,
> स्वप्नसंगमी रंगत होती - तरीहि अजुनी फुलराणी ती।

"तारकांचे गाणे" या कवितेत तारकांचे मानवीकरण केले गेलेले आहे. या तारका एकमेकींला बोलावून आकाशाच्या अंगणात खेळू पाहात आहेत. लहान मुली शांत वातावरणामध्ये, त्यांच्याकडे कुणी पाहात नाही अशावेळी खेळ खेळणे अधिक पसंद करतात. बालकवींच्या तारका-देखील अशा एकांतात खेळू पाहात आहेत. त्या म्हणतात,

'कुणि नाही ग, कुणि नाही आम्हांला पाहत बाई.
शांति दाटली चोहिकडे , या ग आता पुढे पुढे.
लाजत लाजत , हळूच हासत
खेळ गडे , खेळू कांही , कोणीही पाहत नाही.'

" संध्यातारक " कवितेत रजनीमाता संध्यातारक या आपल्या बाळाला अंगाई गीत गाऊन निजविते आहे. " तृणपुष्प " या कवितेत बालकवी सृष्टिसतीच्या मनोवेधक अशा या चिमुकल्या बाळाचे स्वागत करतांना दिसतात " शारदीय सौंदर्यदेवता" या कवितेत प्रभात--कालीन तारकांचे कवी वर्णन करतो -

प्रभातकाली काव्यतारका सोज्वल गगनांत
उदयाचलि परिधान करुनिया पीतांबर येत
मुकुट कळ्यांचा शिरी, उषेचे सिंहासन केले ,
हालवीत कचभार सृष्टिचे उत्थापन बोले.

मानवीकरणाची अशी असंख्य उदाहरणे बालकवींच्या कवितेत विखुरलेली आहेत.

बालकवी निसर्गवस्तूंची उपमानरूपानेही योजना करताना अनेक ठिकाणी दिसतात. त्यांच्या कवितेत रूपक आणि उत्प्रेक्षा या अलंकारांचा

अधिक आढळ होतो. " फुलराणी " ही सारीच कविता एक रूपककथा बनते . तारका या बालमैत्रिणी बनून आकाशाच्या अंगणात खेळ खेळत असतात. संध्यातारक रजनीमातेचे चिमुकले बाळ असते. बालकवींच्या कवितेत सर्वत्र अशी रूपकांची पेरणी असते. " अरुण" या कवितेत उष:काली पूर्वसमुद्रावर रम्य सुवर्णाची छटा पसरते आणि हे दृश्य वाचता वाचता उत्प्रेक्षांच्या सुंदर वृष्टीत वाचक न्हाऊन निघतो. बालकवी या दृश्यावर उत्प्रेक्षा करतात -

अरुण चितारी, नभ:पटाला रंगवितो काय
प्रतिभापूरित करी जगाला की हा कविराय!
कीं नवयुवती उषासुंदरी दारी येवोनी
रंगवल्लि-का रम्य रेखिते राजस हस्तांनी ?

" दवबिंदू " या कवितेत कवीने दवबिंदूवर चढत्या उत्प्रेक्षा योजून सौंदर्य - -निर्मिती साधली आहे. या कवितेतील सा-याच उत्प्रेक्षा हृद्य अशा आहेत -

सृष्टीच्या हृदयातून प्रीतीची सरिता वाहे,
तीतून उसळे वरती - दवबिंदु मनोरम का हे ?
की दृवुनि तारका चित्ती - स्वर्गीच्या विमल ज्योती
उतरुन पातल्या खाली - ही माळ तयांची झाली ?
सौंदर्यझरी ज्योत्स्ना ती - अवकाशीझरली राती,
सौंदर्यसुधाबिंदू ते - की दिसती हे मज पुढते ?
स्वर्गाची तेजोवृत्ति - अवनीची मुग्धा प्रीती ,
संमीलित होऊनि की ही- दवबिंदुमालिका होई ?

बालकवींच्या कवितेत निसर्गचित्रणातील उद्दीपन , पृष्ठभूमी, उपदेश, तत्वज्ञानप्रतिपादन ही रूपे अभावानेच जाणवतात. पृष्ठभूमिरूप निसर्ग-

-चित्रणाला त्यांच्या कवितेत फारसे स्थान नाही. "गाणा-या पक्ष्यास " या कवितेत " समय रात्रीचा कोण हा भयाण। बळे गर्जे हे त्यात घोर रान", असे वर्णन येते. या वर्णनास काहीशा ओढातीणीनेच पृष्ठभूमिरूप निसर्गचित्रण असे म्हणता येईल. "प्रेमाचे अल्लडतेचे चित्र ", निराशेचे गीत " या दोन कवितांत उद्दीपनरूप निसर्गचित्रण आलेले आहे. या दोन्ही स्थळी विप्रलंभ श्रृंगाराचे उद्दीपन म्हणून निसर्गचित्रण आलेले आहे. जलदामधून चंद्रकला भर भर धावत असते,ती आकाशात विलसत असते, पण हृदयांतरी चित्तचंद्रिका नसते, त्यामुळे जड हृदयाचे गीत शून्य मनाने तो गात असतो -

"चंद्रकला गगनी विलसे - जलदांमधुनी धावतसे,
चित्तचंद्रिका हाय परी - न दिसे मजला हृदयांतरी. "

"निराशेचे गीत " मध्ये कवी " रवि तीक्ष्णकरे ये मज जाळायाला - हा चंद्र विषाकर झाला " असे म्हणतो . " माझा लहानसा बाग " या कवितेत भ्रमराच्या मधुपानावरून " गुणग्रहणा" चा उपदेश केलेला आहे. येथे मुलाला सांगण्यात आलेले आहे -

"मुला, न म्हण टोचितो भ्रमर तो स्वशुंडा फुला,
पितो सुरस तो, गुणग्रहण सांगतो बा तुला;
धरोनि बहु मोद तो रस सदा जसा चाखितो
तसा पिऊनि तू भले सुगुण मानसी वांछितो.

"तृणपुष्पांवर" अनेक आघात केले जातात, कित्येक जण त्याला तुडवीत असतात, पण त्याचे चित्त कधीच खिन्न होत नाही. या वर्णनात उपदेशाची थोडीफार व्यंजना आहे. बालकवी सृष्टीच्या गायकास -

ही सृष्टीची
निगूढतेची
तत्त्वे याची
सांग उकलुनी आम्हांते

असे म्हणत असले तरी, मुळातच धर्म, ईश्वर, ज्ञान इत्यादी कल्पनांविषयी बालकवींचे मन अतिशय साशंक होते. " हृदयाची गुंतागुंत " या कवितेत ते म्हणतात -

हे ज्ञान मला तर अज्ञानापरि भासे
मी सोडविता ते उलटे बांधी फासे
मन विटले, विटली शब्दचिकित्सा सारी,

अशा विचारसरणीमुळेच त्यांचे मन त्या अव्यक्त शक्तीशी समरस होताना दिसत नाही. आणि कदाचित यामुळेच " जडतेला खिळुनी राहो हृदयबंध उकलत नाहो ", " हाय! सुटेना दृढ देहाची परि बसली गाठी! " या -सारखे खेदोगार त्यांना काढावे लागले आहेत. दिव्यरसी जीव विरून जाणे हे जीवित खरे, पण " ते जीवित न मिळे माते " अशी खंत बालकवींनी व्यक्त केली आहे. बालकवींच्या अशा विचारामुळे निसर्गचित्रणाच्या-माध्य- -मातून केलेली तत्त्वजिज्ञासा त्यांच्या कवितेत आढळत नाही. उलट सृष्टीचे कोडे उकलत नाही, " तेजोमार्गावर चित्त वळत नाही, म्हणून त्यांचे मन दिव्य विचारांना उद्विग्नपणे हाका मारीत असलेले " कवीचा विचार" या कवितेत दिसून येते. बालकवींना निसर्ग आवडे तो केवळ त्याच्या सौंदर्यामुळे,. निसर्गातून काही उपदेश शोधावा, तत्त्वजिज्ञासा करावी, उद्दीपनाच्या रूपाने त्याची योजना करावी अशा त-हेची वृत्ती बाल- -कवींच्या मध्ये आढळत नाही. प्रो. भा.ल. पाटणकर लिहितात,

"बालकवींना सृष्टी गुरुमाऊली वाटली नाही किंवा तिच्यात ईश्वराचे दर्शन झाले नाही: त्यांना तेथे दिसली असेल तर कळ्यांचा मुकुट घातलेली सृष्टिदेवता. विश्वातील सौंदर्याने ते मंत्रमुग्ध होत असत." [१] डॉ. रा. शं. वाळिंबे सांगतात, " निसर्गाशी तादात्म्य पावल्यामुळे बालकवींना निसर्गातून बोध घेता येणे शक्यच नव्हते. निसर्गाच्या निकट सान्निध्यामुळे त्यांना सौंदर्य, प्रेम व आनंद या त्रयीचा साक्षात्कार झाला. यापरते निसर्गाने त्यांनी कोणतेही तत्त्वज्ञान शिकविले नाही. आणि इतरांना बोधामृत पाजावयास सापडावे या हेतूने त्यांनी निसर्गाचा उपयोग करून घेतला नाही. निसर्ग व मानव यांच्यामधील विरोध त्यांनी अनेक ठिकाणी स्पष्ट केला असून निसर्गाची आनंदमयता व सौंदर्यपूर्णता यावर भर दिलेला आहे, हे खरे असले, तरी वर्ड्स्वर्थने केले, त्याप्रमाणे निसर्गातील वस्तूंच्या द्वारे त्यांनी मानवाला कोणतेही धडे दिले नाहीत. निसर्गातील वस्तूंच्या ठायी मानवी भावनांचा व मानवी कृतींचा त्यांनी वारंवार अध्यारोप केलेला आहे हे खरे असले तरी, वस्तू मानवी जगातील निरनिराळ्या नैतिक सद्गुणांची प्रतीके आहेत असे त्यांनी मानले नाही"[२]

<u>सुमित्रानंदन पंतांच्या निसर्गकवितेत आढळणारी विविधरूपे -</u>

बालकवी निसर्गसौंदर्य न्याहाळता न्याहाळता सहसा स्वप्नसृष्टीत शिरतात. सुमित्रानंदन पंतांमध्ये अशी स्वप्नसृष्टी फारच थोडया ठिकाणी आढळते. निसर्गाच्या वास्तविक रूपसौंदर्यावरच ते आपल्या कल्पनेचा साज चढवितात. त्यामुळे निसर्गातील वस्तूंचे सौंदर्य त्यांच्या कवितेत पुरेपूर आढळते. निसर्ग हा सुमित्रानंदन पंतांच्या आनंदाचे आलम्बन झाल्याची अनेक उदाहरणे

[१] भा.ल. पाटणकर, बालकवींची समग्र कविता, रामकृष्ण, मुंबई-४ द्वि.आ. १९५०, पृ. ५२

[२] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टल प्रका. पुणे पृ. आ. १९८६ पृ. ४४

त्यांच्या कवितेत आढळतात. "गुंजन " हिमाद्रि " "उच्छ्वास "- सावन " "बादल ", "वीचिविलास ", "निर्झरी ", यांसारख्या कवितांत आलम्बन -रूप निसर्गचित्रण मिळते. " हिमाद्रि " कवितेत हिमालयाच्या सौंदर्याने कवी भावविभोर होऊन जातो –

"भीम विशाल शिलाओं का,
वह मौन हृदयमें अब तक अंकित,
फेनों के जलस्तम्भों-से वे,
निर्झर रभस वेग से मुखरित,
चीड़ों के तरु वन का तम,
सांसें भरता मन में आन्दोलित,
दरियों की गहरी छायायें,
ज्योतिरिंगणों से भी गुंफित !
गाते उर में क्षिप्र स्त्रोत,
लहराते सर तुषार के निर्मल,
सौरभ की गुंजित अलकों से,
छू समीर, उर करता शीतल,
नीली, पीली, हरी, लाल,
चपलाओं का नभ जगता चंचल,
रजत कुहासे में, क्षण में,
माया ग्रांतर हो जाता ओझल ! "

[हिमाद्रि-स्वर्णकिरण ]

वेगाने वाहाणारे फेसाळणारे झरे, चीडवृक्षाच्या राईत साचणारा अंधार, द-यांमधील दाट छाया, जलाशयावर दिसणारा तुषारांचा शिडकाव, वा-यावर वाहाणा-या सुगंधाच्या लाटा, आकाशात चमकलेले विविध रंगी विजांचे नर्तन, चंदेरी धुक्यात अदृश्य होणारा परिसर इत्यादी हिमप्रदेशा-

-तील नेमकी दृश्ये कवीने टिपलेली आहेत. श्रावणमहिन्यामध्ये या पर्वत-प्रदेशाची शोभा काही न्यारीच असते. अपार पसरलेला मेखलाकार पर्वत, त्यावर उमललेली शेकडो फुले, पायथ्याशी असणारे जलाशय अशा दृश्यांनी कवीची कल्पना फुलली नाही तरच आश्चर्य! " उच्छ्‌वास " - सावन" या कवितेत मेखलाकार पर्वत प्रदेशाने कवीला कसे खिळवून ठेवले होते हे लक्षात येते. " प्रभात का चाँद " ही कविता आलम्बनरूप अशीच आहे. प्रभातकालीन चंद्राचे [illegible] कवी वर्णन करतो -

" नील पंक मे धँसा अंश जिसका उस श्वेत कमल-सा शोभन
नभो नीलिमा में प्रभात का चाँद उनींदा हरता लोचन।
इसमें वह न निशा की आभा, दुग्ध फेन-सा यह नव कोमल,
मानवीय लगता नयनों को स्नेह पक्व सकरूण मुखमण्डल।

[प्रभात का चाँद - स्वर्णकिरण ]

उषःकालीन चंद्र कवीला निळया चिखलामध्ये किंचितशा बुडालेल्या श्वेतकमळाप्रमाणे वाटतो. या चंद्राचे " स्नेह पक्व सकरूण मुखमण्डल " मोठे मानवीय वाटते! " गुंजन " काव्यसंग्रहातील " गुंजन " नामक कविता पंतांच्या आलम्बनरूप निसर्गचित्रणाच्या दृष्टीने एक सुरेख उदाहरण ठरेल -

वन - वन , उपवन
छाया उन्मन - उन्मन [illegible] गुंजन।
नवचयके आलिओंका गुंजन
रूपहले, सुनहले आम्र बौर
नीले, पीले औ", ताम्र भौंर,
रे गंध - अन्ध हो ठौर ठौर
उड पाँति - पाँति में चिर - उन्मन
करते मधु के वनमें गुंजन।
वन के विटपों की डाल - डाल
कोमल कलियों से लाल - लाल,
बैठी नव-मधु की [illegible],
[illegible] उन्मन
[illegible]।

फैली नव - मधु की रूप ज्वाल ,
जल - जल प्राणों के अलि उन्मन
करते स्पन्दन, करते गुंजन।
अब फैला फूलों में विकास,
„मुकुलों के उर में मदिर-वास,
अस्थिर सौरभ से मलय - श्वास ,
जीवन - मधु संचय को उन्मन
करते प्राणों के अलि गुंजन - "

[ गुंजन ]

या कवितेत भ्रमरांच्या गुंजारवाचे वर्णन आहे. आंब्याची झाडे रुपेरी, सोनेरी मोहराने लगडली आहेत. या मोहरावर जागजागी निळ्या, पिवळ्या , तांबूस रंगाचे भुंगे थव्याथव्याने गुंजारव करीत आहेत. सारे कसे गंध - अंध झाले आहेत. वनभर नव वसंताचे तेज पसरले आहे. वन--वृक्षांची डहाळी डहाळी कोमल कळ्यांनी लालसर बनली आहे. फुले उमलली आहेत, आणि त्यांच्यातून मदिर सुगंध चौहिकडे पसरत आहे. या उमलत्या फुलांवर गुंजारव करीत भ्रमर आपल्या जीवनमधुचा संचय करीत आहेत. नववयातील भ्रमरांचा हा मादक गुंजारव आपणांलाही तल्लीन करून सोडल्याशिवाय राहात नाही. पंतांच्या कवितेत साध्यरूप चित्रणाची अशी अनेक उदाहरणे आढळतात. या आलम्बनरूप निसर्गचित्रणात यथातथ्य वर्णनाची पंतांची वृत्ती व्यक्त होऊन जाते.

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत उद्दीपनरूप निसर्गचित्रणाची अनेक उदाहरणे आढळतात. या उदाहरणांत निसर्ग कवीच्या मन:स्थित भावांना उद्दीपित करण्याचे काम करतांना दिसतो. निसर्गाचे मधुर रूप प्रेमिकांचे हृदय प्रफुल्लित करते आणि त्यांच्या सहवाससुखात भर घालते.

मधुवनातील सुगंधाने भरलेले वातावरण प्रेमिकांना कसे उन्मत्त बनवून टाकते -

"डोलने लगी मधुर मधु वात
हिला तृण वृन्त कुंज तरु पात डोलने लगी प्रिये! मृदु वात
गुंज मधु गंध धूलि हिम गात। "

[ पल्लविनी ]

निसर्गाच्या अशा अनुकूल वातावरणात प्रेयसी-बद्दल अधिकाधिक अनुरक्ती निर्माण होते आणि मग सा-या निसर्गात तिचेच सौंदर्य कवीला दृष्टीगोचर होऊ लागते. " मधुवन " कवितेत कवीला प्रेयसीचे मदिर सौंदर्य सा-या निसर्गात विखुरलेले आहे असे वाटते -

" आज उन्मद मधु - प्रात
गगन के इन्दीवर से- नील
झर रही स्वर्ण-मरन्द समान
तुम्हारे शयन - शिथिल सरसिज उन्मील
छलकता ज्यों मदिरालस प्राण। "

[ मधुवन ].

संयोगाच्या वेळेला निसर्ग असा सुखकर होत असला तरी वियोगाच्या वेळी तो तापद ठरतो. निसर्गातील सुंदर वस्तू मिलनाची ओढ अनावर करून टाकतात. प्रियतमेची आठवण करून देण्याचे आणि वियोगाच्या व्यथा उद्दीप्त करण्याचे काम निसर्गाकडून होते. सुमित्रानंदन पंतांना निसर्ग त्यांच्या प्रियतमेची आठवण करून देतो. " सुधि " नामक कवितेत कवी सांगतो -

" तडित- सा सुमुखि! तुम्हारा ध्यान,
प्रभा के पलक मार, उर चीर,

गूढ गर्जन कर जब गंभीर
मुझे करता है अधिक अधीर,
जुगुनुओं से उड मेरे प्राण
खोजते हैं तब तुम्हें निदान। "

[सुधि ]

आपल्या सुमुखीची कवीला आठवण येऊन काजव्याप्रमाणे त्याचे प्राण भटकत राहतात आणि तिचा शोध घेतात," नौकाविहार " कवितेत शारदीय चांदणे सगळीकडे हसत असते. कुसुमकलिका जागी होउ लागते आणि यादृश्याने कवी हृदयात " ल्हादिनी प्रेयसी स्मृति " जागी होते. वियोगकाळी कवी कोकिल कूजित ऐकतो आणि मग त्याच्या वियोग-दग्ध हृदयाची वेदना तीव्र होऊन जाते, वसंत ऋतू सारीकडे आग उधळत आहे असे वाटू लागते-

काली कोकिल सुलगा उर में
स्वरमयी वेदना का अंगार
आया बसन्त, घोषित दिगन्त
करती, भर पावक की पुकार। " [युगान्त]

पंतांच्या एका कवितेत केकीच्या नृत्याने विरहिणी व्याकुळ होते आणि तिचे डोळे पाणावून जातात. ही वियोगिनी सांगते ,

" जिसे देख वह नाच रही थी
मैं वह सब थी समझ गई।
अह! वह वर्षा ऋतु! वे वारिद! वह मेरा
अविरल दृग जल। "

[ वीणा ]

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत उद्दीपनरूप निसर्गाची अशी अनेक उदाहरणे मिळतात.

सुमित्रानंदन पंतांच्या मानवीकरणरूप निसर्गचित्रणाची काही उदाहरणे तिस-या प्रकरणात आली आहेतच. सुमित्रानंदन पंत निसर्गावर मानव-आकृति, मानव-क्रिया आणि मानव भावनांचा आरोप करून त्याच्याशी एकात्मता साधितात. त्यांच्या " संध्या ", "छाया", "किरण ", " चाँदनी ", " पवन ", "बादल ", इत्यादी कवितेत निसर्गदृश्ये मानवरूप धारण करूनच येतात. त्यांची संध्या मानवीरूपात अशी आढळते -

" शान्त-स्निग्ध सन्ध्या सलज्ज मुख
देख रही जल तल में.
नीलारूण अंगों की आभा
छहरी लहरी दल में।

[ युगवाणी ]

त्यांची ही संध्या जलामध्ये आपल्या सलज्ज मुखाचे प्रतिबिंब पाहाते आहे, तिच्या नीलारूण अंगाचे सारे सौंदर्य जललहरीवर तरळले आहे . या संध्येचे कवीने अनेक ठिकाणी मानवीकरण करून वेगवेगळ्या रूपात तिला साकार केलेले आहे. नव वसंताच्या सरस स्पर्शाने पंतांची वसुधा रोमांचित होते, आणि शस्यावलीच्या रूपाने तिच्या यौवनाचा भार विकसित होत राहातो -

नव वसन्त के सरस स्पर्श से
पुलकित वसुधा बारंबार
सिहर उठी स्मित शस्यावलि में,
विकसित चिर यौवन के भार,

[ अनंग, पल्लव ]

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत पृष्ठभूमिरूप निसर्गचित्रणाची काही उदाहरणे आढळतात. " ग्रंथि " या काव्यात एक प्रेमकथा सांगितलेली आहे. या प्रेमकथेची पृष्ठभूमी म्हणून त्यांनी मधुमासाचे वर्णन केलेले आहे-

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वह मधुर मास था, जब गंध से
मुग्ध हकेकर झूमते थे मधुप दल,
रसिक पिक से सरस तरुण रसाल थे,
अवनि के सुख बढ रहे थे दिवस - से।

मधुमासामध्ये मधुपांचा समूह सुगंधाने बेहोश होऊन इकडे तिकडे डोलत होता. तरुण रसाल वृक्ष कोकिल कूजिताने आनंद विभोर झाले होते. आणि अशा सुख निर्भर काळात एक प्रेमकथा घडत होती. युवकांच्या कथेला साजेशी अशी पृष्ठभूमी येथे पंतांनी निर्माण केलेली आहे. " एक तारा " कवितेत एकटेपणात वावरणा-या ता-याचे वर्णन आहे. या ता-याचे एकाकीपण व्यक्त होण्याच्या दृष्टीने,

नीरव संध्या मे प्रशांत
डूबा है सारा ग्राम प्रांत ।

पत्रों के आनत अधरों पर सो गया निखिल वन का मर्मर,
खग कूजन भी हो रहा लीन, निर्जन गोपथ अब धूली हीन.

अशी पृष्ठभूमी निर्माण केली आहे. तथापि त्यांच्या कवितेत पृष्ठभूमीरूप निसर्गचित्रणाची उदाहरणे तुरळकच आढळतात .

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत उपदेशरूप निसर्गचित्रणाची असंख्य उदाहरणे मिळतात. या बाबतीत त्यांची वृत्ती वर्ड्स्वर्थ सारखी आहे. वर्ड्स्वर्थप्रमाणेच त्यांना निसर्ग हा गुरु वाटतो. "हिमाद्रि " नामक कवितेत ते सांगतात ,

" शिखर शिखर ऊपर उठ तुमने
मानव - आत्मा कर दी ज्योतित
हे असीम आत्मानुभूति में लीन
ज्योति शृंगों के भूभृत ! "

" सोच रहा, किसके गौरव से
मेरा यह अंतर्जग निर्मित,
लगता तब, हे प्रिय हिमाद्रि,
तुम मेरे शिक्षक रहे अपरिचित।

["हिमाद्रि-स्वर्ण-किरण ]

कवीला सा-या निसर्गामध्ये काहीना काही शिकण्यासारखे आहे असे वाटते. सरिता त्याला अंतर्बाह्य एकरूप होण्यास सांगते आणि उंच सखल प्रदेशा--तून अविरल प्रवाहित होत राहून ती त्याला प्रेमाचा पाठ शिकविते. सुकलेल्या देठावर कोमेजलेली कळी त्या अवस्थेतही उमलत रहाते आणि कवीला सांगते की, पदरी पडलेली दु:खे हसत हसत सहन केली पाहिजेत; पण या कलिकेसारखे सहनशील होणे कवीला जमत नाही आणि तो आपली विवशता व्यक्त करीत म्हणतो -

" वन की सूखी डाल पर
सीखा कलि ने मुसकाना
मैं सीख न पाया अब तक
सुख से दु:ख को अपनाना। "

[गुंजन ]

दवबिंदू मानवीजीवनाच्या क्षणभंगुरतेकडे कवीचे लक्ष वेधून घेतो, तर पुष्प आपली सारी प्रफुल्लता फळाला अर्पण करुन आत्मबलिदानाचा आदर्श त्याच्यापुढे उभा करते. फुलाच्या या त्यागवृत्तीने कवी आश्चर्यचकित होतो आणि म्हणतो- " महत है, अरे आत्म-बलिदान। " या आत्म-बलिदानाप्रमाणे फूल त्याच्या-पुढे दानशीलतेचाही धडा ठेवते. ते निरिच्छपणे आपल्या सुगंधाचे दान करीत असते. जललहरी कवीच्या जीवनात उत्साह निर्माण करीत असते. अशाप्रकारे कवीला निसर्गात ममत्व, स्नेह, उत्साह आणि त्याग यांचे आदर्श सापडतात.

कवी " मधुपकुमारी "; व " विहगबालिका" आणि सरितेपासून गाणे शिकून आपले जीवन सुखासमाधानात काढू इच्छितो आहे. निर्झराचा त्याग त्याला त्याच्यापासून शिकावयाचा आहे. आपल्या मनाला कवी निर्झरापासून त्यागाचा धडा शिकावयास सांगतो आहे. "निर्झर" कवीला त्यागातच सुख असल्याचा पाठ शिकवतो आहे -

" निर्झर की अजस्त्र झर् - झर् ।
आओ, मन । नव पाठ सीख लो
इस गिरि निर्झर के रव से
यह निर्मल जलस्त्रोत गिर रहा
गिरि के चरणों में कब से ।
जो न अश्रु अंजलि देता हो
वह क्योंकर सुख पाएगा?
जिसे नहीं देना आता हो
वह किससे कैसे लेगा ?

[ वीणा ]

थोडक्यात, सारा निसर्ग कवीला गुरु स्थानी आहे.

निसर्ग आणि सौंदर्य यांचा उपासक असलेला हा कवी आरंभापासूनच चिंतनशील आहे. त्यात पुन्हा छायावादी संप्रदायाचा आणि विवेकानंद व रामतीर्थ यांच्या तत्त्वज्ञानाचा त्याच्यावर मोठा प्रभाव आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानप्रतिपादनरूप निसर्गचित्रणाची उदाहरणे सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत सर्वत्र विखुरलेली आहेत. त्यांना निसर्गामध्ये अज्ञातशक्तीचे प्रतिबिंब दिसते आणि सर्वत्र त्या शक्तीचे संदेश ऐकू येतात. झंझावातामुळे समुद्र ढवळून निघतो, सर्वत्र बुडबुडे विखुरले जातात आणि मग लाटांचा हात उभारून कोणीतरी आपल्याला बोलावीत आहे असे कवीला वाटत राहाते.

क्षुब्ध जल - शिखरों को जब वात
सिन्धु में मथकर फेनाकार
बुलबुलों का व्याकुल संसार
बना, बिथरा देती अज्ञात,

उठ तब लहरों से कर कौन
न जाने मुझे बुलाता मौन ?

प्रथम-रश्मीच्या आगमनाबरोबर विहगबाला कलरव करु लागते, फुलांमध्ये मृदू हास उमलते. या गोष्टींनी कवी विस्मित होऊन जातो आणि निसर्गात भरुन राहिलेल्या अज्ञात शक्तीबद्दल त्याच्या मनात कुतूहल निर्माण होते. कवी अंधारालाही विचारतो " किसके पद की छाया हो तुम ?" परंतु त्याला उत्तर मिळत नाही. मग अधिकच अधीर होऊन तो विचारत राहतो,

" मैं चिर उत्कंठा-तुर
जगती के अखिल चराचर
यों मौन मुग्ध किसके बल ? "
[पल्लविनी]

कवीला आकाश आणि समुद्र , प्रभात आणि रात , मधुमास आणि वर्षा , ज्योत्स्ना आणि अंधार - या सर्वांतून अज्ञाताचे मौन निमंत्रण जाणवते . तारे, जललहरी, दवबिंदू , खद्योत, विद्युत, सुगंध , विहगबालिका हे सारे त्या अज्ञात -शक्तीचे दूत आहेत असे त्याला वाटत राहते. " न जाने मुझे स्वप्न में कौन फिराता छाया जग में मौन ?" असा प्रश्न तो स्वत:शीच विचारु लागतो. सुमित्रानंदन पंतांची अज्ञाताबद्दलची ही जिज्ञासा केवळ कल्पना नाही. ती एक प्रकारची अनुभूतीच आहे. खालील ओळी कवीची ही अनुभूती स्पष्ट करणा-या आहेत -

" न जाने कौन , अयि द्युतिमान
जान मुझको अबोध अज्ञान
सुझाते हो तुम पथ अनजान
फूँक देते छिद्रों में गान,
अहे सुख-दुख के सहचर मौन।
नहीं कह सकती तुम हो कौन! "

" तुम हो कौन!" हा प्रश्न पंतांच्या कवितेत अनेक ठिकाणी आलेला आहे. कवीने या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी निसर्गातिल वस्तुवस्तूला छेडलेले दिसते. " इस पीपल के तरु के नीचे किसे खोजते हो ?" असे तो खद्योताला विचारतो, तर तो पतंगाला प्रश्न करतो -

" क्षीण ज्योति में निज, किसका धन
ढूंढ रहे हो कर तम भंग ,
किस अज्ञाता के जीवन को
ज्योतित हो कर रहे, पतंग?"
[वीणा ]

" लतिका के कंपित अधरोंसे " या कवितेत मंद वा-यावर पसरणारा सुगंध, विजेचे नर्तन या गोष्टींतून कवीला ईश्वरी रहस्य जाणवत राहाते. मग तो भारावला जाऊन विचारत राहातो,

" किस प्रकाश का गूढ चित्र यह
आज धरित्री के पट पर
पत्रों की मायाविनि छाया
खींच रही है रह रहकर। "
[ वीणा ]

"वीचिविलास", "मौननिमंत्रण", "नक्षत्र," "मधुरिमा के मृदु हास।" या कविता वरवर जरी चाळल्या तरी सुमित्रानंदन पंतांचे हृदय अज्ञातशक्तीच्या कुतूहलाने कसे भरुन राहिले होते हे लक्षात येते. तत्त्वजिज्ञासा हा त्यांच्या कवितेत आढळणारा फार मोठा विशेष आहे.

सुमित्रानंदन पंताचा ईश्वरावर विश्वास होता. हे सारे विश्व म्हणजे एक चिद्विलास आहे अशी काहीशी त्यांची दृष्टी होती. समस्त सृष्टी एका सूत्रात गुंफली आहे असे त्यांना वाटे -

" एक छबी के असंख्य उडगन।
एक ही सब में स्पन्दन।। "

[पल्लविनी]

त्यांच्या अशा विश्वासामुळेच त्यांच्या कवितेत जागोजाग तत्त्वजिज्ञासा आढळते.

अलंकरणरुप निसर्गचित्रण हा सुमित्रानंदन पंतांचा आणखी एक ठळक विशेष. पंतांच्या नजरेसमोर हिमालयासारखा सुंदर प्रदेश होता. या हिमप्रदेशातील सौंदर्यात ते स्वतःला हरवून बसलेले होते, त्यामुळे त्यांना उपमानांची कधीच वाण पडलेली दिसत नाही. त्यांच्या नजरेसमोर असंख्य उपमाने दत्त म्हणून उभी राहिलेली दिसतात. मानवी वस्तुस्थितीचे, भाव--भावनांचे चित्रण करतांना त्यांनी निसर्गातील उपमानांची योजना केलेली आढळतेच, पण निसर्गचित्रण करीत असतानाही त्यांनी निसर्गातील उपमानांचा वापर केलेला आहे. " आँसू" कवितेमध्ये आपल्या जीवनाचे वर्णन करतांना ते लिहितात,

" मेरा पावस ऋतु सा जीवन
मानस सा उमडा अपार मन,
गहरे, धुँधले, धुले, साँवले,
मेघों - से मेरे भरे नयन।

कभी उर में अगणित मृदु भाव
कूजते हैं विहगों-से हाय।
अरुण कलियों से कोमल घाव
कभी खुल पडते हैं असहाय।

[ आँसू-पल्लव ]

कवीने येथे आपल्या जीवनाला वर्षाॠतूची, मनाला मानस सरोवराची आणि पाणावलेल्या डोळयांना मेघांची उपमा दिलेली आहे. त्याच्या हृदयातील अगणित मृदू भाव पक्ष्यांच्याप्रमाणे कूजन करतात आणि कधी कोमल जखमांवरील खपल्या निघून त्या लाल कळयांप्रमाणे उघडया झालेल्या दिसतात. या वर्णनात निसर्गातील उपमानांनी मानवी जीवनाचे वर्णन केलेले आहे. खालील उदाहरणात निसर्गाच्या चित्रण करतांना निसर्गातील उपमानांची योजना केलेली आहे -

" वारि बेलि सी फैल अमूल,
विकसा औ" सकुचा नवजात
बिना नाल के फेनिल फूल,
छुईमुई सी तुम पश्चात
छूकर अपना ही मृदु गात
मुरझा जाती हो अज्ञात। "

'वीचि-विलास' या कवितेमध्ये कवीने केलेले चंचल लहरीचे हे वर्णन आहे. ही लाट पाणवेली-सारखी सरितेच्या वर्णहीन किनारा-यावर पसरते आहे. पण लगेच ती लाजाळूच्या झाडाप्रमाणे आपले मृदू गात आकसून घेते आहे.

उपमा व रूपक हे सुमित्रानंदन पंतांचे आवडते अलंकार. त्यांतही उपमा त्यांना अधिक प्रिय. " अनंग ", "निर्झरी " , " बादल " या कवितांत त्यांनी अनेक सुरेख उपमा योजिलेल्या आहेत. " बादल " कवितेत त्यांनी अनेक उपमांनी मेघांचे वर्णन केले आहे. आपली संध्याकाळची अवस्था वर्णितांना हे मेघ सांगतात,

" संध्या का मादक पराग पी
झूम मलिन्दों-से अभिराम,
नभ के नील कमल में निर्भय
करते हम विमुग्ध विश्राम,

फिर बाडव-से सांध्य सिन्धु में
सुलग, सोख उसको अविराम,
बिखरा देते तारावलि - से
नभ में उसके रत्न निकाम।

[ बादल. पल्लव ]

सुमित्रानंदन पंत कधी नारी सौंदर्याचे वर्णन करताना निसर्गातील उपमाने योजतात, तर कधी निसर्गसौंदर्याचे वर्णन करताना नारीच्या अंगोपांगांची योजना करतात. " मधुवन " कवितेत आपल्या प्रेयसीची मदिर छटा सा-या निसर्गात विखुरली आहे असे कवीला वाटते, तर आपल्या प्रेयसीच्या वर्णनात तिच्या ठिकाणी निसर्गातील सा-या सुंदर गोष्टी एकवटल्या आहेत असे भासते -

" उषा का था उर में आवास,
मुकुल का मुख में मृदुल विकास,
चाँदनी का स्वभाव में भास -। "

[पल्लव ]

प्रेयसीच्या डोळ्यांत कवीला निळ्या गगनाचे सौंदर्य दिसते आणि त्याच्या मनाचा पक्षी त्यात निभ्रांतपणे झोपून जातो. कवीने एका सुरेख रूपकाने हा भाव व्यक्त केला आहे -

" तुम्हारी आँखोंका आकाश
सरल आँखों का नीलाकाश
सो गया मेरा खग अनजान। "

मानवीजीवनाचा निसर्गावरील प्रभाव -

सुमित्रानंदन पंतांनी निसर्गचित्रणाच्या विविध रूपांची अशाप्रकारे योजना केलेली दिसते . याशिवाय त्यांच्या कवितेत मनुष्य जीवनदेखील निसर्गावर परिणाम करते अशी एक कल्पना आढळते. निसर्ग दर्शनाने मनुष्य आनंदित होतो, निसर्गात त्याला मानवी-भाव-भावना दिसतात, निसर्गा- -पासून तो ब-याच गोष्टी शिकतो, निसर्ग त्याच्या तत्त्वजिज्ञासेला चालना देतो, निसर्ग त्याच्यापुढे अनेक उपमाने आणून ठेवतो, अशा त-हेचे वर्णन अनेक कवींनी केलेले आहे, पण मानवीजीवनाचा निसर्गावर परिणाम होतो, निसर्ग मानवी जीवनाचे अनुकरण करतो, माणसाच्या दु:खाने तो दु:खी होतो अशा -प्रकारचे वर्णन काव्य प्रांतात फारसे आढळत नाही. सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत ते आढळते. बालकवींच्या कवितेत अशाप्रकारचे चित्र कुठेही आलेले नाही. " गुंजन " मध्ये सा-या निसर्गाने आपल्या प्रेयसीचे शिष्यत्व स्वीकारले आहे अशी कल्पना करीत पंत लिहितात,

" खोल सौरभ का मृदु कचजाल
सूँघता होगा अनिल समोद,
सीखते होंगे उड खगबाल
तुम्हीं से कलरव, केलि विनोद
चूम लघु पद चंचलता प्राण
फूटते होंगे नव जल स्त्रोत
मुकुल बनती होगी मुस्कान। " "[गुंजन]

समोद अनिलाने आपल्या प्रियतमेच्या मृदू केशसंभारापासून सुगंध उचलला, खगबालांनी तिच्यापासून कलरव घेतला आणि कळ्यांनी तिच्या हास्याचे अनुकरण केले. असे येथे सांगितले आहे. , कवी पुढे म्हणतो,

"सीखा तुम से फूलों ने, मुख देख मंद मुसकाना,
तारों ने सजल नयन हो, करुणा -किरणें बरसाना।
सीखा हँसमुख लहरों ने आपस में मिल खो जाना,
अलि ने जीवन का मधु पी, मृदु राग प्रणय के गाना। "

[ "मानव" गुंजन ]

संवेदनाशील मनुष्य दुस-याच्या दु:खाने दु:खी होत असतो, पण पंतांच्या कवितेत जगाच्या दु:खामुळे अश्रू ढाळणारी चंद्रिका आढळते -

" जग के दुख दैन्य शयन पर
यह रुग्णा जीवन बाला
रे कब से जाग रही वह
आँसू की नीरव माला।

"चाँदनी", पल्लविनी ]

येथे चंद्रिका मानवाच्या दु:खाने, दैन्याने दु:खी झालेली दिसते.

सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत कधी कधी असेही दिसते की, निसर्गाच्या माध्यमातून मानवी भावना व्यक्त होण्याऐवजी निसर्गच मानवी भावनांच्या माध्यमातून व्यक्त होतो. पुढील उदाहरण अशाप्रकारचे आहे,

गिरिवर के उर से उठ - उठ कर,
उच्चाकांक्षाओं से तरुवर
है झाँक रहा नीरव नभ पर

अनिमेष, अटल, कुछ चिन्तापर । "

या उदाहरणात उंच वृक्षांवर उच्चांकाक्षेची कल्पना केलेली आहे.

निष्कर्ष :

[१] सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत बालकवींच्या कवितेपेक्षा निसर्गचित्रणाची अधिक रूपे व्यक्त झालेली आहेत. बालकवींच्या कवितेत ख-या अर्थाने आलम्बन रूप, मानवीकरणरूप, आणि अलंकरणरूप हीच निसर्गरूपे आढळतात. याउलट सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत निसर्गचित्रणाची प्राय: सर्व रूपे आढळून येतात.

[२] बालकवींच्या निसर्गचित्रणात आलम्बनरूप निसर्गचित्रणही फारच थोड्या कवितेत दिसते. बालकवी स्वप्नसृष्टीतच अधिक तल्लीन होत असल्यामुळे असे घडते. त्यामानाने सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत आलम्बनरूप निसर्गचित्रण अधिक येते. मानवीकरणरूप निसर्गचित्रणाची प्रवृत्ती दोघांतही प्रकर्षाने आढळते.

[३] अलंकरणरूप निसर्गचित्रणाच्या बाबतीत बालकवी आणि पंत दोघांनीही निसर्गातील विविध उपमाने योजिलेली आढळतात. रूपकाची योजना दोघांतही आढळते, बालकवींचा अधिक भर उत्प्रेक्षेवर दिसतो, तर सुमित्रानंदन पंतांना उपमा अधिक प्रिय असलेली दिसते.

[४] बालकवींनी उद्दीपनरूप निसर्गचित्रणाचा कुठेही प्रयत्न केलेला नाही. याउलट पंतांच्या कवितेत प्रेमभावनेचा आविष्कार होत असल्यामुळे स्वाभाविकरीत्याच उद्दीपनरूप निसर्गचित्रणाची अनेक उदाहरणे त्यांच्या कवितेत आढळतात. त्याचप्रमाणे बालकवींच्या मनात अध्यात्म, ज्ञान, या गोष्टींविषयी संभ्रम असल्यामुळे त्यांनी उपदेशरूप किंवा तत्त्वजिज्ञासारूप निसर्गचित्रण केलेले नाही. याउलट अव्यक्त शक्तीवर विश्वास असल्यामुळे पंतांच्या कवितेत तत्त्वप्रतिपादनरूप निसर्गचित्रणाची उदाहरणे जागोजाग आढळतात. पंत वर्ड्स्वर्थप्रमाणे निसर्गाला गुरु मानतात आणि त्यामुळे उपदेशरूप निसर्गचित्रणाची अनेक उदाहरणे त्यांच्या कवितेत आलेली आहेत.

अनेक उदाहरणे त्यांच्या कवितेत आलेली आहेत.

[५] पृष्ठभूमिस्थ निसर्गचित्रण दोघांच्याही कवितेत अभावानेच येते.

[६] बालकवींच्या कवितेत निसर्गसौंदर्याचा मानवावर होणारा परिणाम दिसून येतो. सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत हा परिणाम तर व्यक्त झालाच आहे शिवाय मानवजगताचा निसर्गावर होणारा परिणामही सांगितलेला आहे. मानव -जगताच्या निसर्गावर होणा-या अशा परिणामाचे वर्णन बालकवींच्या कवितेत कुठेही येत नाही.